# शासकीय तंत्रनिकेतन कोल्हापूर

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
विद्यानगर, कोल्हापूर ४१६००४
फोन – (०२३१) २५२१०३८, फॅक्स २५२१०१६
E-mail : gpkolhapur@yahoo.com


जा.क्र.शातंनिको/विवि/२०२०-२०२१/प्राथ,माध्य.शिक्षकांचे पाल्य/सवलत/4363 दि- 16 DEC 2021

**अत्यंत महत्वाचे-**

**प रि प त्र क –**

विषय -शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ करीता प्रथम ,व्दितीय व तृतिय वर्षातील प्रवेश घेतलेल्या प्राथमिक (**PTC**) / माध्यमिक (**STC**) शिक्षकांचे पाल्य असलेल्या विद्यार्थ्यांनी शुल्क सवलतीचे अर्ज त्वरीत भरुन सादर करणे बाबत...

शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ करीता प्रथम, व्दितीय व तृतिय तसेच थेट व्दितीय वर्षातील सर्व शाखेतील विद्यार्थ्यांपैकी जे विद्यार्थी प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षकांचे पाल्य असलेल्या विद्यार्थ्यांनी त्यांचे **PTC/STC** सवलतीचे अर्ज आवश्यक त्या सही शिक्क्यासह दिनांक ३१/०१/२०२१ पर्यंत आवश्यक त्या कागदपत्रासह (साक्षांकित) विद्यार्थी विभागात जमा करावयाचे आहेत याची नोंद घ्यावी. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी इ.११ वी व १२ वी या वर्षाकरीता प्राथमिक/माध्यमिक शिक्षकांचे पाल्यानी सदर सवलत घेतली नसेल असे विद्यार्थी सदर सवलतीस पात्र असतील. सदरचे अर्ज विहीत दिनांकापर्यंतच सादर करावेत, जे विद्यार्थी विहीत मूदतीत वरील सवलतीसाठी अर्ज करणार नाहीत ते या सवलतीस पात्र राहणार नाहीत त्यांना शैक्षणिक वर्षाचे शिक्षण शुल्क भरावे लागेल याची नोंद घ्यावी.

विद्यार्थ्यांनी अन्य कोणत्याही प्रकारची स्कॅालरशिप, फिशिप, **EBC** व इतर सवलतीसाठी अर्ज केले असतील तर त्यांनी या सवलतीसाठी अर्ज करु नये.

अर्ज आणि सोबत द्यावयाची कागदपत्रे (सर्व प्रती साक्षांकित करणे आवश्यक आहे)

१) शिक्षक/ शिक्षकेतर सेवक यांच्या मुला-मुलींकरीता फी माफीचा विहीत नमून्यातीलअर्ज दोन प्रतीत.
२) माध्यमिक शिक्षकांच्या अर्जावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद यांची सही व शिक्का.
३) प्राथमिक शिक्षकांच्या अर्जावर गट शिक्षणाधिकारी याची सही व शिक्का.
४) प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी दहावी गुणपत्रक, शाळा सोडल्याचा दाखला, रेशन कार्ड इ. झेरॅाक्स प्रती.
५) थेट व्दितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी दहावीचे गुणपत्रक/बारावीचे गुणपत्रक/आयटीआयचे गुणपत्रक, शाळा सोडल्याचा दाखला , रेशन कार्ड इत्यांदीच्या झेरॅाक्स प्रती जोडाव्यात.
६) ज्या विद्यार्थ्यांनी इ.११ वी व १२ वी शिकत असताना प्राथमिक/माध्यमिक शिक्षकांचे पाल्यानी सदर सवलत घेतली नसले बाबतचे संबंधित महाविद्यालयाचे पत्र जोडावे.
७) व्दितीय व तृतिय वर्षातील विद्यार्थ्यांनी अर्जासोबत मागील दोन्ही सेमिस्टरच्या गुणपत्रिका व रेशन कार्ड इत्यांदीच्या झेरॅाक्स प्रती जोडाव्यात.

प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर.

प्रत- सर्व विभागप्रमुख यांचे मार्फत विभागातील सुचना फलकावर लावणेसाठी.
२/- त्यांना सूचित करणेत येते की, सदरच्या सूचना सर्व संबंधित विद्यार्थ्यांचे निदर्शनास आणावे.
१.यंत्र २.स्थापत्य/उपयोजित ३. विद्युत ४. माहिती तंत्रज्ञान ५. शर्करा ६. धातुशास्त्र ७. अणुविद्युत ८. औद्योगिक अणुविद्युत. ९. कर्मशाळा १०. परिक्षा विभाग ११. मानव्यशास्त्र १२. विद्यार्थी विभाग सुचना फलक. १३) मुलांचे /मुलींचे वसतिगृह
प्रत- श्री. इंगळे, प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करणेसाठी.